# अपर पोलीस महासंचालक व संचालक कार्यालय,
# पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे.

डॉ.होमी भाभा रोड, चव्हाणनगर, पुणे 411 008.

Website : mahpolwireless.gov.in FAX : 020-25657974

Email : dirpolwireless.pune@nic.in Phone : 020-25652505


क्र.ई/प्रलि-2/सेवापटातील शेरे/2017/ 2265 पुणे, दिनांक 29 एप्रिल 2017

विषय :- पोलीस बिनतारी संदेश विभागातील कर्मचा-यांचे सेवापटातील शेरे लिहीणेबाबत

संदर्भ :- या कार्यालयाचे परिपत्रक क्र.33 (भाग-) क्र.ई/प्रलि-2/सेवापटातील शेरे/4950/2008, दिनांक 18/09/2008

--- 000 ---

<u>प्रस्तावना</u> :-

उपरोक्त विषयांकित प्रकरणी, संदर्भाधीन परिपत्रकान्वये, पोलीस बिनतारी संदेश विभागातील सहायक पोलीस उपनिरीक्षक (ASI) या दर्जाच्या रेडियो यांत्रिकी, प्रमुख यंत्रचालक, भांडारपाल, वीजतंत्री व आरेखक या संवर्गातील कर्मचा-यांचे शेरे संबंधित कर्मचा-यांच्या नेमणूकीपासून पहिल्या 5 वर्षापर्यंतचे शेरे सेवापटातील शेरे संबंधित पोलीस उप अधीक्षक बि.सं. यांनी लिहावेत व 5 वर्षानंतर सदर कर्मचा-यांचे सेवापटातील शेरे संबंधित विभागीय पोलीस अधीक्षकांनी लिहावेत आणि पोलीस हवालदार व त्याखालील दर्जाच्या कर्मचा-यांचे (HC & PC) त्यांचे नेमणूकीपासून सुरुवातीच्या 10 वर्षापर्यंतचे सेवापटातील शेरे संबंधित पोलीस उप अधीक्षक बि.सं. यांनी लिहावेत व 10 वर्षानंतर सदर कर्मचा-यांचे सेवापटातील शेरे संबंधित विभागीय पोलीस अधीक्षकांनी लिहावेत अशा सूचना दिलेल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणी असे निदर्शनास आले की, सहायक पोलीस उपनिरीक्षक (ASI) या दर्जाच्या रेडियो यांत्रिकी, प्रमुख यंत्रचालक, भांडारपाल, वीजतंत्री व आरेखक या संवर्गापैकी रेडियो यांत्रिकी व आरेखक या संवर्गातील पदे ही सरळसेवेची असून, सहायक पोलीस उपनिरीक्षक (ASI) या दर्जाच्या प्रमुख यंत्रचालक, भांडारपाल व वीजतंत्री या संवर्गातील पदे ही पदोन्नतीची असल्याने सदर पदावर पदोन्नती होण्यापूर्वी सदर कर्मचा-यांची पोलीस हवालदार पदी 10 वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त सेवा झालेली असते. अशा परिस्थितीत सदर संवर्गातील कर्मचारी हे पोलीस हवालदार पदावर कार्यरत असताना संबंधित विभागीय पोलीस अधीक्षक/पोलीस उप आयुक्त हे सेवापटातील शेरे लिहितात आणि सदर कर्मचा-यांची सहायक पोलीस निरीक्षक (ASI) पदी पदोन्नती झाल्यानंतर त्यांचे वार्षिक शेरे संबंधित पोलीस उप अधीक्षक बिसं यांचेकडे पाठविण्यात येते. ही बाब प्रशासकीय दृष्टीकोनातून अनुचित आहे. वास्तविक प्रथम नियुक्ती झालेले सपोउनि (रेडियो यांत्रिकी व आरेखक) दर्जाच्या कर्मचा-यांची नियुक्तीच्या दिनांकापासून पहिले 5 वर्षे वार्षिक शेरे संबंधित पोलीस उप अधीक्षक बिसं यांनी आणि 5 वर्षे सेवा झाल्यानंतर पुढील वार्षिक शेरे संबंधित विभागीय पोलीस अधीक्षक यांनी लिहिणे अभिप्रेत आहे आणि पदोन्नतीचे पदावरील सपोउनि (प्रमुख यंत्रचालक, भांडारपाल व वीजतंत्री) यांची सेवा 10 वर्षापेक्षा जास्त झालेली असल्याने त्यांचे सेवापटातील वार्षिक शेरे संबंधित विभागीय पोलीस अधीक्षक / पोलीस उप आयुक्त यांनी लिहिणे आवश्यक आहे असा अर्थ अभिप्रेत होता. तथापि तशी कार्यवाही झाली नसल्याचे दिसून येते.

2. निवडसूचीसाठी मागविण्यात आलेल्या सेवापटामध्ये शेरे लिहिताना अनेक त्रुटी दिसून आलेल्या आहेत. त्यापैकी ठळक त्रुटी खालीलप्रमाणे आहेत.

-2-

1) सेवापटात प्रत्येक वर्षासाठी शेरे लिहिले नाहीत. तसेच लिहिले शेरे हे मोघम स्वरुपाचे असतात. त्यांची वर्गवारी (Grading) केलेली नसते.
2) संबंधित कर्मचारी खात्यातंर्गत परीक्षा (उदा.वर्गीकरण 1 परीक्षा/प्राविण्य परीक्षा व सायफर प्रशिक्षण इत्यादी नोंदी) उत्तीर्ण झालेल्या नोंदी घेतलेल्या नाहीत.
3) जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याची सेवापटात नोंद घेतलेली दिसून येत नाही. तसेच सादर केलेले जात वैधता प्रमाणपत्राची प्रत सेवापटात जोडणे आवश्यक आहे.
4) संबंधित कर्मचा-यास देण्यात आलेली कालबद्ध पदोन्नतीबाबत नोंदी घेतलेल्या नाहीत. तसेच यापुर्वी पदोन्नती नाकारली असल्यास सदर आदेशाची नोंद सेवापटात घेतल्याचे दिसून येत नाही.
5) सेवापट ही कायम स्वरुपी अभिलेख आहेत तरी अनेक सेवापट अतिशय जीर्ण झालेले, फाटलेल्या स्वरुपात असतात, सदर सेवापटाचे बाईंडीग केलेले नसते.

3. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन या कार्यालयाचे संदर्भाधीन परिपत्रक अधिक्रमित करण्यात येऊन खालीलप्रमाणे पोलीस कर्मचारी यांचे वार्षिक शेरे लिहीण्याबाबत स्थायी आदेश देण्यात येत आहे.

**<u>स्थायी आदेश</u>**

पोलीस बिनतारी संदेश विभागातील विविध पदावरील पोलीस कर्मचारी यांचे सेवापटातील वार्षिक शेरे यापुढे खालील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या अधिकारी यांनी लिहावे.

| पदनाम | नियुक्तीपासून पहिली 10 वर्षे व त्याचे आतील सेवा झालेले कर्मचारी यांचे वार्षिक शेरे लिहीणारे अधिकारी | नियुक्तीपासून 10 वर्षापेक्षा जास्त सेवा झालेले कर्मचारी यांचे वार्षिक शेरे लिहीणारे अधिकारी | शेरा |
|---|---|---|---|
| सपोउनि (रेडियो यांत्रिकी व (आरेखक) | संबंधित पोलीस उप अधीक्षक बिसं / सहायक पोलीस आयुक्त बिसं | संबंधित पोलीस अधीक्षक बिसं / पोलीस उप आयुक्त बिसं | सरळसेवेने नियुक्ती होत असल्याने |
| सपोउनि (प्रमुख यंत्रचालक) (वीजतंत्री) (भांडारपाल) | संबंधित पोलीस अधीक्षक बिसं/ पोलीस उप आयुक्त बिसं | संबंधित पोलीस अधीक्षक बिसं / पोलीस उप आयुक्त बिसं | पदोन्नतीने नियुक्ती होत असल्याने |
| पोलीस हवालदार (यंत्रचालक, वीजतंत्री) (स्तंभ कारागीर) (सुतारमार) (कथिलगार) (कर्मशाळा सहाय्यक) (रंगारी) (आवेष्टक) (सहायक भांडारपाल) | संबंधित पोलीस उप अधीक्षक बिसं / सहायक पोलीस आयुक्त बिसं | संबंधित पोलीस अधीक्षक बिसं / पोलीस उप आयुक्त बिसं | सरळसेवेने नियुक्ती होत असल्याने |

-3-

| | | | |
|---|---|---|---|
| पोलीस हवालदार (चालक, कर्मशाळा मदतनीस) | संबंधित पोलीस अधीक्षक बिसं/ पोलीस उप आयुक्त बिसं | संबंधित पोलीस अधीक्षक बिसं / पोलीस उप आयुक्त बिसं | पदोन्नतीने नियुक्ती होत असल्याने |
| पोलीस नाईक (चालक, कर्मशाळा मदतनीस) | संबंधित पोलीस अधीक्षक बिसं/ पोलीस उप आयुक्त बिसं | संबंधित पोलीस अधीक्षक बिसं / पोलीस उप आयुक्त बिसं | पदोन्नतीने नियुक्ती होत असल्याने |
| पोलीस शिपाई (चालक, कर्मशाळा मदतनीस) | संबंधित पोलीस उप अधीक्षक बिसं / सहायक पोलीस आयुक्त बिसं | संबंधित पोलीस अधीक्षक बिसं / पोलीस उप आयुक्त बिसं | सरळसेवेने नियुक्ती होत असल्याने |

2. सेवापटामध्ये वार्षिक शेरे लिहीताना खालीलप्रमाणे दक्षता घ्यावी.

1) सेवापटातील शेरे हे संबंधित कर्मचा-याचे वर्षभरात केलेल्या कामाचे सर्वसाधारण मूल्यमापन करुन लिहावेत. केवळ वार्षिक तपासणीच्या वेळी एखादा कर्मचारी आजारपणाचे किंवा इतर कारणास्तव गैरहजर असल्यास, त्यांचे शेरे लिहीण्याचे टाळू नयेत. परंतु त्यांचे गैरहजेरीबाबतचे कारण त्यांचे सेवापटात नमूद करुन वर्षभरात केलेल्या कामाचे मूल्यमापन करुन त्यांचे वर्गवारीसह लिहावेत.

2) प्रत्येक कर्मचा-यांचे सेवापटातील शेरे वर्षा अखेरीस म्हणजेच प्रत्येक वर्षी फेब्रुवारी पूर्वी पूर्ण करावेत. सदर शेरे लिहिताना मोघम स्वरुपाचे न लिहिता खालीलप्रमाणे प्रतवारी करावी.

| | | | |
|---|---|---|---|
| अतिउत्कृष्ठ | अ+ | Outstanding/ Excellent | A+ |
| उत्कृष्ठ/अतिउत्तम | अ | Very good/ Very well | A |
| निश्चित चांगला/उत्तम | ब+ | Positively Good | B+ |
| चांगला/समाधानकारक/पाळीप्रमाणे | ब | Good/Well/ Satisfactory/ In turn fit | B |
| साधारण | ब- | Average/high enough | B- |
| साधारणहून कमी | क | Below average | C |

3) संबंधित कर्मचा-यांना त्यांने त्याचे कामात सुधारणा करण्यासाठी वर्षभरात त्याला दिलेली लेखी समज किंवा ज्ञापन दिले आहे काय ? ही बाब विचारात घेऊन प्रतिकूल शेरे लिहावेत. ज्या कर्मचा-यांचे सेवापटातील शेरे प्रतिकूल म्हणजे साधारण किंवा साधारणहून कमी (ब- किंवा क) अशा स्वरुपाचे लिहिले असतील तर तसेच संबंधित कर्मचा-यास वाचून दाखवावेत आणि प्रतिकूल शेरे वाचून दाखविल्याबद्दल संबंधित कर्मचा-याची सेवापटावर दिनांकीत स्वाक्षरी घ्यावी, जेणेकरुन संबंधित कर्मचा-यास त्यांचे कामात सुधारणा करण्याची संधी प्राप्त होईल. परंतु संबंधित कर्मचारी शेरे लिहिण्याचेवेळी गैरहजर असल्यास त्यास लेखी कळवावे आणि तशी सेवापटात नोंद घ्यावी.

4) संबंधित कर्मचा-यांचे खात्यांतर्गत परीक्षा उत्तीर्ण अथवा सायफर प्रशिक्षण पूर्ण केल्यास त्याबाबतच्या नोंदी व जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याची नोंदी तसेच कालबद्ध पदोन्नतीबाबतच्या नोंदी सेवापटात घेतल्याची खात्री करावी. नोंदी घेतल्या नसल्यास सदर बाब संबंधित कार्यालयाचे निदर्शनास आणून देण्यात यावी.

-४-

5) एखाद्या विभागातील विभागीय पोलीस उप अधीक्षक बिसं/ सहायक पोलीस आयुक्त बिसं हे पद रिक्त असल्यास, संबंधित कर्मचा-यांचे वार्षिक शेरे त्या त्या विभागाचे पोलीस अधीक्षक बिसं / पोलीस उप आयुक्त बिसं यांनी वार्षिक तपासणीचे वेळी लिहावेत.

6) सदर सेवापट संबंधित कर्मचारी सेवानिवृत्त होईपर्यंत व त्यानंतरही त्यांचे सेवापट जतन करणे आवश्यक असते. ही बाब विचारात घेऊन जीर्ण झालेल्या व फाटलेल्या सेवापटांची व्यवस्थित बांधणी (Book Binding) करुन घ्यावीत.

3. सदर आदेशाची सर्व पोलीस अधीक्षक बिसं / पोलीस उप आयुक्त बिसं, पोलीस उप अधीक्षक बिसं / सहायक पोलीस आयुक्त बिसं यांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

( रितेश कुमार )
अपर पोलीस महासंचालक व
संचालक, पोलीस बिनतारी संदेश,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

पोलीस अधीक्षक बि.सं.(मुख्यालय) पुणे / पोलीस उप आयुक्त बिसं, मुंबई
पोलीस अधीक्षक बिसं, पुर्व विभाग, नागपूर / पश्चिम विभाग, पुणे.
पोलीस उप अधीक्षक, बि.सं., मुख्यालय पुणे / संशोधन व विकास, पुणे / प्रशिक्षण केंद्र, पुणे / सायफर पुणे / वाहतूक पुणे/ कोल्हापूर परिक्षेत्र / नाशिक परिक्षेत्र/ ठाणे परिक्षेत्र / नागपूर परिक्षेत्र / अमरावती परिक्षेत्र / औरंगाबाद परिक्षेत्र / नांदेड परिक्षेत्र / महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
सहायक पोलीस आयुक्त बिसं, मुंबई / ठाणे / पुणे / नवी मुंबई / नागपूर

प्रत : सर्व पोलीस आयुक्त / संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गासहीत) / सर्व समादेशक रारापो बल गट

2/- निवडसूचीसाठी वेळोवेळी केलेल्या मागणीनुसार संबंधित कर्मचारी यांची सेवापटावरील माहिती पोलीस बिनतारी संदेश विभागाच्या प्रभारी अधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.